वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. ९ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# आका इतने करोड लेकर तू कहां जाएगा-सुरेश धस आक्रमक

# पाप झाकण्यासाठी ओबीसीचा आसरा घेत आहेत-मनोज जरांगे



Email.- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com

## संतोष देशमुख हत्येप्रकरणी पैठणमध्ये मोर्चा,धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप

पैठण - संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना जात नाही हे केवळ आरोपी आहे, त्यांना फाशी देण्यात यावा अशी मागणी आज पैठणमध्ये मोर्चामध्ये देशमुख कुटुंबीयांनी केली आहे.

पैठणच्या मोर्च्यात बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, आजपर्यंत सर्व जण संतोष देखमुख यांना न्याय मिळावा ही भूमिका घेत आहे. कुणाला त्याचे राजकारण करायचे नाही. दीपक केदार हे संतोष देशमुख यांना न्याय देण्याची भूमिका घेत आहे, ते राजकारण करत नाही. धनंजय देशमुख म्हणाले की, सर्वजण न्यायाच्या भूमिकेत आहेत. कोणत्याच ओबीसी नेत्यांना टार्गेट करण्यात येत नाहीये . यात



कुठल्या जातीचा उल्लेख नाही. गुन्हेगारांना जात नाहीत ही विकृती आहे. दीपक केदार म्हणाले की, संभाजीनगरमध्ये सुपारी घेऊन ओबीसीच्या नावाने आंदोलन झाले आहे. प्रतिमोर्चाचा हा पायंडा महाराष्ट्रासाठी धोकादायक आहे. तो निघाला नाही पाहिजे. याला मराठा आणि ओबीसी असा रंग देण्याची गरज नाही. कोपर्डीच्या प्रकरणी कुणीही प्रतिमोर्चा



काढला नाही. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाइंडला वाचविण्यासाठी सुपारी घेऊन हा मोर्चा काढण्यात आला असा माझा आरोप असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, संतोष देशमुख यांना न्याय मिळाला पाहिजे ही आमची भूमिका आहे. मुलीच्या न्यायासाठी आपण सर्वांनी एकत्र

▶▶ पान २ वर

# जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या नियुक्तीवरही 'आका'ची मोहोर

## 'निष्क्रिय अधिकारी' असा ठप्पा असतानाही पाठकांना नियुक्ती मिळाली कशी?






बीड, (दिव्य न्युज):- संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी निगडित खंडणीच्या गुन्हयात सध्या कोठडीची हवा खात असलेल्या 'आका'च्या मेहेरबानीमुळेच 'निष्क्रिय' असा ठप्पा लागलेले अविनाश पाठक यांचा जिल्हाधिकारी होण्याचा 'राजमार्ग' मोकळा झाला. अविनाश पाठक यांच्या नियुक्तीवर 'आका'ची मोहोर उठल्यानंतरच अविनाश पाठक यांना जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार मिळाला ! -

संतोष देशमुख हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणामुळे बीडमधील मुलकी तसेच पोलीस प्रशासनाची अब्रू वेशीवर टांगली आहे. कणाहीन, स्वाभिमान नसलेले आणि 'आका'ची जी हुजुरी करणाऱ्या अधिकाऱ्यांची

▶▶ पान २ वर

# जातीयवाद वाढवून बीड जिल्ह्याला आणि राजकीय नेतृत्वाला बदनाम करु नका - मोईन मास्टर



## गुन्हेगारांना सोडू नका, सगळ्यांना शोधा आणि फाशी द्या

बीड, (दिव्य न्युज):- केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही माणुसकीला आणि अखंड मानव जातीला काळीमा फासणारी आहे. या प्रकरणातील एकाही गुन्हेगाराला सोडू नका, सगळ्यांना शोधा आणि फाशी द्या अशी मागणी बीड येथील ज्येष्ठ समाजसेवक मोईन मास्टर यांनी केली आहे. मात्र गेल्या एक महिन्यापासून या निंदनीय घटनेच्या आडून ज्या पद्धतीने जिल्ह्यात मराठा आणि वंजारा समाज असा जातीय भेद केला जात आहे तो अतिशय गंभीर आणि दोन्ही समाजासाठी घातक आहे. या जातीयवादातून दिवसेंदिवस एकमेकाविरुद्धचा द्वेष वाढू लागला आहे. या घटनेचा वापर राजकीय ढाल आणि जातीयवादाचे विष पेरण्यासाठी होऊ नये ही सर्वांचीच अपेक्षा आहे. केवळ एकाच समाजाला टार्गेट करणे आणि जिल्ह्याचे नेतृत्व

▶▶ पान २ वर

### आजी-माजी आमदारांना आताच जातीवाद कसा आठवला?

बीड जिल्ह्यात काही आजी - माजी आमदार सद्या ओबीसी - मराठा असा भेदभाव करतांना दिसत आहेत. मात्र बीड आणि माजलगावमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाच्या दरम्यान घडलेल्या घटनांचा विसर पडला आहे. बीडमध्ये ज्या आमदारांच्या घरात जाळपोळ झाल्याची घटना घडली, त्यावेळी मुस्लिम समाजातील काही लोकांनी त्यांच्या कुटुंबीयांना सुखरूप बाहेर काढले. त्यावेळी जीव वाचविणाऱ्या लोकांनी जात किंवा धर्म पाहिला नाही.मात्र तेच आमदार आज ओबीसी - मराठा असा भेदभाव करून मस्साजोग येथील घटनेच्या आडून एका राजकीय नेतृत्वावर जातीच्या चष्म्यातून पाहत आहेत असेही मोईन मास्टर यांनी म्हटले आहे.

# करुणा मुंडेंच्या गाडीत साडी नेसून बंदूक ठेवलेल्या पोलिसाचं नाव जाहिर

पैठण, (दिव्य न्युज):- करुणा मुंडे जेव्हा परळीला गेल्या होत्या तेव्हा त्यांच्या गाडीमध्ये बंदूक ठेवण्यात आलेलं होतं. हे बंदूक एका पोलिसाने साडी नेसून गाडीमध्ये ठेवलं होतं, असा आरोप सुरेश धस यांनी केला होता. पैठणच्या सभेमध्ये बोलताना सुरेश धस यांनी त्या पोलिस कर्मचाऱ्याचं नाव जाहीर केलं आहे. संजय सानप या पोलिस कर्मचाऱ्याने करुणा मुंडेंच्या गाडीमध्ये बुरखा घालून बंदूक ठेवली होती. असं सुरेश धस म्हणाले.

याच प्रकरणामुळे करुणा मुंडेंना जेलवारी भोगावी लागली होती. त्यांना बीडच्या जेलमध्ये ठेवण्यात आलेलं होतं. त्या प्रकरणात पोलिसच सहभागी होता, असा गौप्यस्फोट धसांनी केला. संतोष देशमुख यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी पैठणमध्ये मोर्चा काढण्यात आला होता. तेव्हा ते बोलत होते.



सुरेश धस पुढे म्हणाले की, बीडमध्ये आणि परळीमध्ये खरेखुरे पोलिस पाठवण्यापेक्षा सोनी टीव्हीवरच्या सीआयडी मालिकेतले पोलिस पाठवावेत. नाहीतरी हे पोलिस अभिनय करीत आहेत, असा टोला धसांनी लागवला. सुरेश

▶▶ पान २ वर

# परळी म्हणजे बिहारचा बाप

## जिल्ह्यात १०९ मृतदेह सापडले; अंजली दमानियांचा आरोप

बीड, (दिव्य न्युज):- परळी म्हणजे बिहारचा बाप झाल्याची गंभीर परिस्थिती सध्या तिथे निर्माण झाली आहे , असं सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिय म्हणाल्या आहेत. या परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक लोक आम्हाला म्हणतात आम्ही तुम्हाला माहिती देऊ, फक्त आमचं नाव देऊ नका, असं दमानिया म्हणाल्या. माध्यमांशी संवाद साधताना त्या असं म्हणाल्या आहेत.

दमानिया यांनी आपल्या सोशल मीडियावर परळी आणि बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी घटनांची माहिती शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी अनेक धक्कादायक व्हिडीओ आणि फोटो पोस्ट केले आहेत. याचदरम्यान धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा केली आहे.

अंजली दमानिया यांनी परळीतील परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना म्हटले की, परळीतील दहशत ही मोठ्या प्रमाणावर

▶▶ पान २ वर

# राष्ट्रवादीला गळती

## शरद पवारांचा पक्ष फुटीच्या उंबरठ्यावर, तटकरेंकडून इन्कार



मुंबई, (दिव्य न्युज):- ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुसंख्य खासदार व आमदार अजित पवार यांच्या पक्षात जाण्याच्या तयारीत असल्याच्या वृत्ताने बुधवारी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. अजित पवार यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आमच्या पक्षाकडून असे कोणतेही प्रयत्न सुरू नसल्याचे सांगून या प्रकरणापासून आपल्या पक्षाला लांब करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातच बुधवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अजित पवार यांची भेट घेण्यासाठी दिल्ली गाठल्याने या प्रकरणात पुढे काय होणार याची चर्चा रंगली.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार राजकीय हाणामारी पुन्हा एकदा सुरू झाली आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुतांश आमदार व खासदार हे अजित पवार यांच्या पक्षात

▶▶ पान २ वर

### कोण आमदार, खासदार नकोत

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातील सुप्रिया सुळे, बजरंग सोनावणे व अमोल कोल्हे या तीन खासदारांना आपल्या पक्षात घेऊ नये असे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील बहुसंख्य नेत्यांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे आमदारांमध्ये जितेंद्र आव्हाड, रोहित पवार व रोहित पाटील यांना कोणत्याही परिस्थितीत सामावून घेऊ नये असेही अजित पवार यांच्या समर्थकांचे म्हणणे असल्याचे त्यांच्या समर्थकांनी सांगितले.

## सावित्रीबाई फुलेंसोबत त्यांच्या शाळेची धुरा वाहणाऱ्या फातिमा शेख कोण होत्या?

# सावित्रीबाईंच्या जोडीने स्त्रीशिक्षणाची ज्योत पुढे नेणाऱ्या फातिमा शेख

( ९ जानेवारी हा फातिमा शेख यांचा जन्मदिन. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासोबत त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य केले होते. त्यांच्या कार्याची ओळख करून देणारा हा लेख पुन्हा शेअर करत आहोत. )

सहसा आपल्याला आपल्या पूर्वजांविषयी माहिती असतं, इथे पूर्वज म्हणजे पुरुष हे आपण गृहित धरतो. शेकडो वर्षं फक्त पुरुषांनी केलेल्या गोष्टींनाच समाजाप्रति असणारं भरीव योगदान समजलं गेलं आहे, मग भले मोठ्यातल्या मोठ्या संकटातून घराला तारून नेणारी बाई असली तर नाव लागतं पुरुषाचंच.त्याचप्रमाणे देशाला, समाजाला मोठं करणाऱ्या महिला अनामिक राहातात, अनेकदा त्यांचा साधा नामोल्लेखही कुठे केला जात नाही, ऋणनिर्देश तर लांबचीच गोष्ट. अशाच आपल्या एक पूर्वज आहेत फातिमा शेख.



सावित्रीच्या सोबतिणी दहा भागांची खास मालिका चालवली. याचा उद्देश होता त्या महिलांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणं ज्यांनी लोकशाही, मानवी हक्क आणि महिला सबलीकरण यासाठी मोठं काम केलं पण ज्यांच्याविषयी आजही फारशी माहिती नाही. या दहा महिला जर भारतीय इतिहासात नसत्या तर आज आपल्याला वेगळंच चित्र दिसलं असतं.'सावित्रीच्या सोबतिणी'हे खास नाव यासाठी कारण जसं सावित्रीबाई फुलेंनी महिलांना शिक्षणाची दारं उघडी करून दिली तसंच या सगळ्या स्त्रियांनी भारतातल्या महिलांच्या हक्कांसाठी प्रयत्न केले,लढा दिला. म्हणूनच या महिला, काही सावित्रीबाईंच्या समकालीन तर काही नंतरच्या पण सर्वार्थाने 'सावित्रीच्या सोबतिणी.

याच मालिकेत आम्ही ओळख करून देतोय सावित्रीबाई फुलेंच्या खऱ्या अर्थाने सहकारी, सखी आणि सहशिक्षिका असणाऱ्या फातिमा शेख यांची.आपण ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले यांच्याविषयी जाणतोच. ज्योतिबांनी वंचितांपर्यंत शिक्षण पोहचवण्याचं काम केलं. ते सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. सावित्रीबाई देशातल्या पहिल्या महिला शिक्षक. त्यांना आपण क्रांतिज्योती म्हणतो.

सावित्रीबाई म्हणत असतील की, माझ्या अनुपस्थितीत माझी सहकारी शाळेचं सगळं काम नीटपणे सांभाळेल, काहीही तोशीस पडू देणार नाही, तर ती स्त्रीही कमी नसणार. सावित्रीबाईंच्या अनुपस्थितीत त्यांनी सुरू केलेल्या शाळेची धुरा समर्थपणे वाहणारी स्त्री म्हणजे फातिमा शेख.

सावित्रीबाईंच्या या सहशिक्षिकेविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुलेंच्या कार्याबद्दल समग्रमपणे लिहिणाऱ्या लोकांकडेही फातिमा शेख यांच्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. अर्थात, त्यांच्याविषयीच्या अनेक गोष्टी सांगितल्या जातात. पण त्यातली वस्तुस्थिती काय आणि कल्पित गोष्टी काय असा फरक करणं अवघड होऊन बसतं.त्या उस्मान शेख यांची बहीण होत्या असंही म्हटलं जातं. एका कथेनुसार जेव्हा महात्मा फुलेंनी मुलींसाठी शाळा सुरू केली तेव्हा त्यांचा वडिलांनी त्यांना घराबाहेर काढलं. त्यावेळेस उस्मान शेख यांनी त्यांना आपल्याकडे जागा दिली. पण उस्मान शेख यांच्याविषयीही फारशी माहिती मिळत नाही.फातिमा शेख यांच्याविषयी एक धागा सापडतो 'सावित्रीबाई फुले समग्र वांड्मय' या पुस्तकात. त्या पुस्तकात एक फोटो आहे, ज्यात सावित्रीबाईंच्या शेजारी आणखी एक महिला बसली आहे. ही महिला दुसरी-तिसरी कोणी नसून फातिमा शेख आहेत.

'सावित्रीबाई फुले समग्र वांड्मय' या पुस्तकाचे संपादक डॉक्टर एमजी माळी यांनी आपल्या प्रस्तावनेत महत्त्वाची माहिती दिली आहे.सावित्रीबाईंचा फोटो कित्येक वर्षांपूर्वी पुण्याहून प्रकाशित होणाऱ्या 'मजूर' या मासिकात छापला होता. हे मासिक १९२४-३० या काळात प्रकाशित होत होतं. याचे संपादक रा. ना. लाड होते. तर माळींना हा फोटो द. स. झोडगे यांच्याकडून मिळाला. झोडगे स्वतः काही काळ 'मजूर' मासिकाचे संपादक होते.लोखंडे नावाचे एक ख्रिस्ती मिशनरी होते. त्यांनी काढलेल्या पुस्तकातही सावित्रीबाईंचा एक फोटो प्रसिद्ध झाला आहे. 'मजूर' मासिकात प्रसिद्ध झालेला फोटो तसंच या पुस्तकातला फोटो दोन्ही सारखेच आहेत. या फोटोत सावित्रीबाईंच्या दोन विद्यार्थीनी खाली बसल्या आहेत आणि स्वतः सावित्रीबाई आणि फातिमा शेख या फोटोत दिसतात. या ग्रुप फोटोवरून सावित्रीबाईंचा तो फोटो तयार केला गेला जो आज आपण सर्वत्र पाहातो.

हा फोटो नसता तर कदाचित आपल्याला फातिमा शेख यांच्याविषयी काहीच माहिती मिळाली नसती. इतकंच काय, आपल्याला सावित्रीबाई कशा दिसतात हेही कळालं नसतं. याच फोटोने फातिमा शेख यांना सावित्रीबाईंसारखंच इतिहासातलं महत्त्वाचं नाव बनवलं आहे.दलित, वंचित आणि स्त्रियांना शिक्षण दिलं म्हणून फुले दांपत्याला अनेक त्रास सहन करावे लागले हे आपण जाणतोच. सावित्रीबाईंना तर अपमान, शिव्या, अंगावर शेण फेकणे अशा अनेक यातना सहन कराव्या लागल्या. जर सावित्रीबाईंच्या अंगावर दगड, चिखल, शेण फेकलं गेलं असेल तर दाट शक्यता आहे की सावित्रीबाईंसोबत सहशिक्षिका म्हणून काम करताना फातिमा शेख यांनाही अशाच त्रासाला तोंड द्यावं लागलं असेल.फातिमा यांचं वय साधारण सावित्रीबाईंइतकंच होतं, त्यामुळे त्यांचा जन्म साधारण १८०-१९० वर्षांपूर्वी झालेला असू शकतो. त्यांनी प्रामुख्याने पुण्यात काम केलं.सावित्रीबाईंनी ज्योतिबांना लिहिलेल्या एका पत्रात फातिमा शेख यांचा उल्लेख सापडतो. सावित्रीबाईंची तब्येत खराब असताना त्यांनी १० ऑक्टोबर १८५६ साली ज्योतिबांना एक पत्र लिहिलं होतं. तोवर वंचितांसाठी, महिलांसाठी पुण्यात अनेक शाळा या दांपत्यांने उभ्या केल्या होत्या.त्यांची चिंता ज्योतिबांना असणं साहजिकच होतं. त्यांना आश्वस्त करण्यासाठी त्या लिहितात, माझी काळजी करू नका, तब्येत ठीक होताच मी पुण्यात परत येईन. फातिमाला सध्या त्रास होत असेल पण ती कुरकुर करणार नाही.फातिमाला कसला त्रास, तर सावित्रीबाईंच्या अनुपस्थिती शाळेची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती.फातिमा कोणी साधीसुधी महिला नव्हती. फातिमा सावित्रीबाईंची मैत्रीण आणि सहकारी होत्या. त्यांना स्वतःचं अस्तित्व होतं आणि सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून त्या वंचिताच्या हक्कासाठी अखेरपर्यंत लढल्या.

# ४० टिप्परचा वाळू घोटाळा अब्जावधीत

## दोन दिवसात २१ कोटींचा दंड, प्रशासन वाळू माफियांचे कंबरडे मोडणार



### या पाच टिप्पर चालकांना १४ कोटींचा दंड

समीर बाबुलाल शेख (रा. आहेर वाहेगाव) याने दीड महिन्यात १०५ ट्रिप वाळू उपसा केला त्याला तीन कोटी दहा लाख ४९ हजार रुपये दंड केला आहे. तर रिजवान बशीर शेख (रा. हिरापूर) याने दीड महिन्यात १९२ ट्रिप केल्याने पाच कोटी, ३६ लाख २७ हजार, ईश्वर शिवनाथ सुखदेव (रा. म्हाळस पिंपळगाव) याने ३९ ट्रिप केल्याने १ कोटी ३९ लाख दंड, गजानन भारत मुगूटराव (रा. बाग पिंपळगाव) याने ९२ ट्रिप केल्याने दोन कोटी ७६ लाख
तसेच अब्दुल बशीर अब्दुल सत्तर (रा. मोमीनपुरा) याने ६६ ट्रिप केल्या, त्यामुळे या मालकाला दोन कोटी नऊ लाख रुपये दंड केला आहे. पाठक यांनी या पाच वाहन मालकांना तब्बल बौदा कोटी पेक्षा अधिक दंड केल्याने खळवळ उडाली आहे. पाठक यांनी वाळू माफिया विरोधात कारवाई सुरु केल्याने गेवराई सह जिल्ह्यातील वाळू माफिया अंडर ग्राउंड झाले आहेत. गेल्या काही दिवसात जालना रोडबर एकहीं हयाया दिसत नसल्याचे चित्र आहे.

## जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची धडाकेबाज कारवाई, माफिया अंडरग्राऊंड

**बीड, (दिव्य न्यूज):- बीड जिल्ह्यात वाळू माफियांचा मोठा नंगानाच सुरू होता. माफियांचा हाच नंगानाच रोखण्यासाठी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कडक कारवाईला सुरूवात केली आहे. पहिल्या टप्प्यात चाळीस टिप्परचा वाळू घोटाळा उघडकीस आला असून तो घोटाळा अब्जावधीत आहे. त्याअनुषंगानेच मागच्या दोन दिवसात सहा टिप्परला तब्बल २१ कोटींचा दंड जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या याच धडाकेबाज कारवाईमुळे वाळू माफिया अंडरग्राऊंड झाले असल्याचे पहायला मिळत आहे.**

जिल्ह्यात दरवर्षी अवैधपणे वाळू उपसा आणि वाहतूक करून स्वतःचे खिसे भरणाऱ्यांची संख्या अधिक आहे. विशेष म्हणजे अनेक पुढारी आणि अधिकारी वाळूचा अवैधपणे व्यवसाय करतात. या सर्वच माफियांचा जिल्ह्यात नंगानाच सुरू होता. आता हाच नंगानाच मोडून काढण्यास जिल्हाधिकारी अविनाश पाठक आणि पोलिस अधीक्षक नवनीत काँवत सरसावलेले आहे. पहिल्या टप्प्यात जिल्हाधिकाऱ्यांकडून जवळपास माफियागिरी करणाऱ्या चाळीस टिप्परवर कारवाई होणार आहे. याअनुषंगानेच मागच्या दोन दिवसात त्यांनी सहा टप्परला २१ कोटींचा दंड केला आहे. कारवाईच्या पहिल्या दिवस एका टिप्परला तब्बल सात कोटींचा दंड करण्यात आला, त्यापाठोपाठच जिल्हाधिकाऱ्यांनी अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्या पाच हयवाच्या मालकांना नोटीस पाठवत तब्बल चौदा कोटी रुपयांचा दंड ठोठवला आहे. पाठक यांनी वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्यास सुरवात केल्याने खळबळ उडाली आहे. त्यासोबतच पाठक यांनी महसूल मधील भ्रष्ट तलाठी, मंडळाधिकाऱ्यांवर निलंबनाचे अस्त्र उगारल्याने भ्रष्टाचार करणाऱ्यांना धडकी भरली आहे. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अवैध वाळू उपसा या विरोधात मोठी मोहीमच उघडली आहे.



अशी झाली कारवाईला सुरूवात

गोदावरी पट्ट्यात म्हणजेच गेवराई तालुक्यात गोदावरी नदीतून आणि सिंदफना नदीतून वाळू उपसा करून माजावर आलेल्या वाळू माफियाना दणका देण्यासाठी जिल्हाधिकारी पाठक यांनी पाडळसिंगी टोलनाक्यावरील फुटेजचा आधार घेतला आहे अशी माहिती त्यांनी दिली. दोन दिवसापूर्वी पाठक यांनी गोकुळ किसन गायकवाड या ह्यावा मालकाला सात कोटी रुपयांचा दंड ठोठवला होता. एकीकडे स्वतः जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे कोटच्यावधी रुपयांचा दंड करण्याची कारवाई करत असताना गेवराईचे तहसीलदार खोमणे मात्र हातावर हात ठेवून मूग गिळून का गप्प आहेत, त्यांचेही वाळू माफियासोबत काही लागेबंधे आहेत का? याची चौकशी करण्याची मगणी होतं आहे.

**ते अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात**

वाळू माफियाना महसूल आणि पोलीस प्रशासनाचे सहकार्य असल्याचे अनेकवेळा उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे अनेक महसूल आणि पोलीस कर्मचारी यांची या धंद्यात पार्टनरशिप असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गेवराई तालुक्यातील गोदावरी पटचात नोकरीस असलेले मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस निरीक्षक, शिपाई, बिट अंमलदार हे या कारवाईने संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

# आका इतने करोड लेकर तू कहां जाएगा-सुरेश धस

पान १ वरून

पैठण - संतोष देशमुख यांना न्याय मिळेपर्यंत या राज्यातील एकही व्यक्ती एक इंचही मागे हटणार नाही. आम्ही या प्रकरणी कुणालाही सोडणार नाही. विशेषतः परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणातील आरोपींनाही आम्ही सोडणार नाही. या दोन्ही प्रकरणातील एकही आरोपी सुटला तर सरकारची गाठ आमच्याशी आहे, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी दिला. जरांगे यांनी यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर थेट हल्ला चढवत त्यांना आपल्या लाभार्थी गुंडांच्या टोळ्यांना थांबवण्याचाही सूचक इशारा दिला.

औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे गुरुवारी संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला उपरोक्त इशारा देत मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, धनंजय मुंडे यांनी जे प्रयोग सुरू केलेत. जे षडयंत्र सुरू केलेत. ते आता आपल्या समर्थकांना रास्ता रोको करण्याचे, मोर्चे काढण्याचे व आंदोलने काढण्यास सांगत आहेत. यामागे दुसरे कुणीही नाही. तेच आहेत. पण ते जास्त खोलात जात आहेत हे त्यांच्या लक्षात येत नाही. तुम्ही संतोष देशमुखांच्या पाठिशी उभे न राहता तुम्ही आरोपींच्या पाठिशी उभे राहण्याचे काम तुम्ही आपल्या लाभार्थी टोळीच्या माध्यमातून सुरू केले आणि तुमच्या कुटुंबातील कुणी गेले तर आम्ही ही असेच मोर्चे काढायचे का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

धनंजय मुंडे हा महाराष्ट्र नेमक्या बाजूने घेऊन जात आहेत? ते मंत्रिपदावर आहेत. संविधानाची शपथ घेऊन या राज्याचा एक प्रमुख व्यक्ती म्हणून तुम्ही काम करता. पण तुम्ही तुमच्या लाभार्थी गुंड टोळीला आमच्याविरोधात आंदोलन करण्यास सांगता. आरोपींना साथ देता. धनंजय मुंडे यांची ही चाललेली दिशा चांगली नाही. असेच सुरू राहिले तर यापुढे सर्वच जाती आपापल्या आरोपीच्या पाठीमागे उभे राहतील. धनंजय मुंडे आपल्या गुंड टोळीच्या मदतीने प्रथमच अशा गोष्टी करत आहेत. देशात पहिल्यांदाच असे होत आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

धनंजय मुंडेंचा ओबीसींमागे लपण्याचा प्रयत्न- मनोज जरांगे

मनोज जरांगे यांनी यावेळी धनंजय मुंडे ओबीसींच्या मागे लपत असल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, धनंजय मुंडे यांच्या लोकांनी धनंजय देशमुख यांना धमकी दिली. संतोष देशमुख यांच्या वेळेस ॲट्रोसिटी दाखल झाली असती तर देशमुखांची हत्या झाली नसती. आता त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांना पोलिस ठाण्यात धमकी देण्यात आली. आम्ही कुठे चुकलो. आम्ही एखाद्या वंजाऱ्याला धमकी दिली का? दलित किंवा एखाद्या मुस्लिमाला धमकी दिली का? अरे धनंजय मुंडे आमच्या रक्तात नाही ते... आमचे रक्त पवित्र आहे. आम्ही आतापर्यंत एकाही जातीविरोधात भाष्य केले नाही. पण नेत्याला सोडत नाही. स्वतःचे पाप झाकण्यासाठी आता धनंजय मुंडे ओबीसीचा आसरा घेत आहेत. याचा ओबीसींचा काय संबंध? खून करणारे तुम्ही. पाप करणार तुम्ही आणि त्यात ओबीसींना ओढणार, असे कसे चालणार... आम्ही कोणत्याही जातीला बोललो नाही व बोलणारही नाही. पण गुंडांना सोडणार नाही.

माझ्यावर कितीही गुन्हे दाखल झाले तरी हरकत नाही. मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच माझ्यावर एसआयटी लावली आहे. मी त्याला घाबरत नाही, मग या गुन्ह्यांना कसा घाबरेन? माझ्यावर १ हजार गुन्हे दाखल झाले तरी मी मागे हटणार नाही. गोरगरीब मराठ्यांना आरक्षणाच्या माध्यमातून न्याय देण्यासाठी माझ्याविरोधात या षंढांच्या व गुंडांच्या कितीही टोळ्या उभ्या राहिल्या तरी हा जरांगे मागे हटत नाही. धनंजय मुंडे यांनी जे करायचे ते करावे. मी अन्याय सहन करणार नाही. मी न्यायासाठी लढेन.

धनंजय मुंडे फसलेत व फसणारच

धनंजय मुंडे यांनी आपल्या लाभार्थी टोळ्यांना थांबवावे. तू खोलात जात आहेस. तू फसत चालला असून, फसणारच आहेस. आता तू मला खेटलास आहेत. आता मी पाहतो. तुझे परळीपासून मुंबईपर्यंत अनेक मॅटर आहेत. माझे २५ तारखेचे उपोषण होऊ दे. त्यानंतर तुम्हाला मनोज जरांगे काय ते दाखवून देतो. मी आतापर्यंत धनंजय मुंडे यांच्यासारख्या नासक्या लोकांचे नावही तोंडात घेतले नाही. आम्हाला ओरिजनल माणसांचे नाव घेतो. अशा माजुरड्यांचे नाव आम्ही घेत नाही. तुम्हाला वाटते तुम्ही लै आडमूठ आहात. पण मराठे नादाला लागले तर तुमच्याहून जास्त आडमूठे आहेत हे लक्षात घ्या. आम्हाला हे राज्य शांत ठेवयाचे आहे. येथील कायदा सुव्यवस्था बिघडू द्यायची नाही म्हणून आम्ही शांत आहोत, असे जरांगे म्हणाले.

# राजेंद्र मस्के यांची शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

बीड, (दिव्य न्युज):- विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर भाजपला सोडचिठ्ठी देऊन शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलेल्या राजेंद्र मस्के यांच्यावर आता पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे. राजेंद्र मस्के यांची शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बीडच्या राजकारणात राजेंद्र मस्के दीर्घकाळापासून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक दिवस भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले होते. मात्र लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांच्या पराभवानंतर भाजपमध्ये ते अस्वस्थ होते. त्यातूनच त्यांनी विधानसभा निवडणूकीच्या अगोदर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. बीड विधानसभा मतथारसंघाच्या निवडणूकीत त्यांनी आ. संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारात सक्रिय सहभाग नोंदवला होता. आता त्यांची शरद पवारांच्या राष्ट्रवादीत जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. पक्षाची मुंबई येथे आज बैठक झाली. त्यानंतर ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



पान १ वरून

## आका इतने करोड

येणं गरजेचे आहे. धनंजय मुंडेंनी काय करावे काय नाही हा त्यांचा प्रश्न आहे. कारण ते लाभार्थी टोळीला रस्त्यार उतरवत आहे. त्यांना हे कळत नाही की एका लेकीने आपला वडील, एका भावाने आपला भाऊ, तर एक माय माऊलीने आपला मुलगा गमावला आहे. संतोष देशमुख यांची क्रुर हत्या त्यांच्याच टोळीतील सदस्याने केली हे त्यांच्या लक्षात येत नाहीये. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ह्या टोळीच्या, पैसे कमावण्याच्या नादात, खंडण्याच्या नादात धनंजय मुंडेंनी त्यांचे आस्तित्व खोलात नेले आहे. त्यानंतरही ते गप्प बसायला तयार नाहीत, मोर्चे काढायला लावत आहे, रस्ता रोको करायला लावत आहेत. त्यामुळे आता त्यांचे पाय खोलात जात आहे. त्यांना कळतच नाहीये की आपण संविधानिक पदावर बसलो आहोत. आपण मंत्री असल्याने आपल्यावर जबाबदारी आहे, हे सर्व मुंडे विसरले आहेत.

## जिल्हाधिकारी अविनाश

फौजच सध्या जिल्हयात उभी राहिली आहे. बीडमध्ये कोण जिल्हाधिकारी असावे, कोण पोलीस अधीक्षक असावे, एवढेच काय, सरकारी कार्यालयात चपराशी कोण असावे, याचा निर्णय देखील 'आका'च्या संमतीशिवाय घेतला जात नव्हता.

दीपा मुधोळ- मुंडे यांच्या कार्यकाळात लोकसभेची निवडणूक झाली. बीड मतदारसंघात भाजपच्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे यांच्यात अत्यंत रोमहर्षक लढत झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दीपा मुधोळ- मुंडे यांना या निवडणुकीत अनेकवेळा दबावाला सामोरे जावे लागले. परंतु त्या बधल्या नाहीत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून त्यांनी तटस्थ भूमिका घेतली. तीन वर्षांचा कार्यकाळ संपला म्हणून किंवा तटस्थ भूमिकेची शिक्षा म्हणून त्यांची बदली झाली आणि जिल्हाधिकारी पदावर टुणकन् उडी मारून अविनाश पाठक आले. सुरुवातीला त्यांच्याकडे पदभार आला. नंतर त्यांची अधिकृत नियुक्ती झाली.

दररोज सकाळी 'आका 'ला फोन करणारे!

अविनाश पाठक हे गेल्या १२ वर्षांपासून बीड जिल्हयात ठाण मांडून आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असा त्यांचा प्रशासकीय प्रवास. दीपा मुधोळ यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागेवर आयएएस अधिकारीच येणे अपेक्षित होते. परंतु विधानसभेच्या निवडणुका तोंडावर असल्यामुळे आणि जिल्ह्यातील माफियागिरीला संरक्षण मिळावे म्हणून 'आका'ने अविनाश पाठक यांच्या जिल्हाधिकारी पदावर मोहोर उठवली ! 'आका'च्या मेहेरबानीने झालेले 'कलेक्टर' असे जिल्हाधिकारी कार्यालयात दबक्या आवाजात बोलले जाते. 'आका'ची ही मेहेरबानी चव्हाट्यावर आणली आमदार सुरेश धस यांनी सध्याचे 'कलेक्टर' सकाळी अकरा वाजता 'आका'ला फोन करतात, असा गौप्यस्फोट त्यांनी केला होता.

निष्क्रियतेचा कळस

अविनाश पाठक हे ज्या ठिकाणी कार्यरत होते तेथे फक्त त्यांनी खुर्ची उबवण्याचे काम केले. चारा घोटाळा उघडकीस आला तेव्हाही ते गप्पच होते. जिल्हा बँकेचे संचालकांनीच वाटोळे केले. पण हे वाटोळे करण्यात आणि गोरगरीब ग्राहकांचे नुकसान करण्यास पाठकही तेवढेच जबाबदार होते. जिल्हा परिषदेत सीईओ असताना त्यांनी जलजीवन घोटाळ्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यांच्याच काळात बीड जिल्ह्यातील नद्या वाळूसाठी खरडून काढण्यात आल्या. शस्त्र परवान्यांचे वाटप कसे झाले, याबद्दलही अनेक सुरस कथा सांगण्यात येतात. एवढे सगळे उपद्व्याप पोटात घालून अविनाश पाठक यांना जिल्हाधिकारी पदावर बसवण्यात आले! संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर आता हेच अविनाश पाठक अचानक जागे झाले असून त्यांनी धडाधड रिव्हॉल्वरचे परवाने रद्द केले आहेत. कालच त्यांनी एका वाळू वाहतूक करणाऱ्या हायवाला सात कोटी रुपयांचा दंड केला !

प्रामाणिक अधिकारी डोळ्यात खुपतात

बीडमध्ये काही अधिकाऱ्यांनी आपल्या प्रामाणिक कामाची छाप सोडली. काही अधिकाऱ्यांनी बेशिस्तीला आवर घालण्याचा प्रयत्न केला. यात सुनील केंद्रेकर, नवलकिशोर राम, राहुल रेखावार, दीपा मुधोळ-मुंडे अशी काही नावे सांगता येतील. जिल्हा शल्यचिकित्सक अशोक थोरात किंवा सुरेश साबळे यांनीही चांगले काम करून दाखवले. चांगले काम केल्यामुळेच त्यांना बीडबाहेरचा रस्ता 'आका'ने दाखवला !

## जातीयवाद वाढवून

संपवण्याचा प्रयत्न करणे कितपत योग्य आहे असा प्रश्न जेष्ठ समाजसेवक मोईन मास्टर यांनी उपस्थित केला आहे. देशमुख कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे मात्र सध्या सुरू असलेला जातीय भेद आणि राजकारण थांबवण्यासाठी सर्वांनीच पुढाकार घ्यायला हवा असेही त्यांनी सांगितले आहे.

बीड येथील समाजसेवक मोईन मास्टर यांनी म्हटले आहे की, बीड जिल्हा हा पुरोगामी विचारांचा आणि माणुसकी जपणारा जिल्हा आहे. जिल्ह्यातील जनतेने आजपर्यंत प्रत्येक समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिलेली आहे. कसल्याही प्रकारचा जातीयवाद किंवा बुद्धिभेद न करता जिल्ह्याचा भूमिपुत्र मोठा व्हावा यासाठी सर्वांनीच हातभार लावलेला आहे. राजकारण , समाजकारण अशा सर्वच बाबतीत प्रत्येकाने एकमेकाला साथ दिलेली आहे. मात्र केज येथील स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यातील सामाजिक दरी कुठेतरी वाढताना दिसत आहे. हत्येची घटना निंदनीयच आहे, या प्रकरणातील सर्व मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. या प्रकरणाशी संबंधित जे कोणी असतील आणि ज्यांच्या विरुद्ध पोलीस तपासात पुरावे समोर येतील त्यांच्याविरुद्ध देखील कठोर कारवाई व्हायला हवी मग ते कोणीही असो. अशा वृत्ती ठेचून काढण्यासाठी संपूर्ण जिल्हा देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी उभा राहील. मात्र गेल्या एक महिन्यात या प्रकरणाच्या अडून ज्या पद्धतीचे राजकारण सुरू आहे त्याविषयी सर्वसामान्यांच्या मनामध्ये प्रचंड चिड आहे. हा प्रकार कोणालाच पटलेला नाही. दररोज कोणी ना कोणी या मुद्द्याचा राजकीय वापर करू पाहत आहे. मराठा आणि वंजारा या जातींविषयी बोलणे, दररोज एकाचे नाव घेणे, कसल्याही प्रकारचे पुरावे नसताना थेट मंत्र्यांवर आरोप करणे, ज्यांचा या प्रकरणाशी संबंध नाही अशा राजकीय व्यक्तींची नावे पुढे करून ज्या पद्धतीने स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचे काम सुरू आहे ते नक्कीच चुकीचे आणि निंदनीय आहे. बीडसारख्या सुसंस्कृत जिल्ह्यात अशा प्रकारचे राजकीय भांडवल करून त्यावरून सुरू असलेली चिखल फेक बीड जिल्हा वासियांनाच नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेलाही पटणारी नाही. कसलेही प्रकारचे पुरावे नसताना एखाद्या व्यक्तीवर गंभीर आरोप करणे कितपत योग्य आहे ? दोषी असतील तर त्यांच्यावर नक्कीच कारवाई व्हायला पाहिजे. मात्र राजकीय सूडबुद्धीने कोणाचे अस्तित्व किंवा प्रतिनिधित्व संपवण्याचा अधिकार कोणालाच नाही हेही पाहिले गेले पाहिजे. सोशल मीडियावरून देखील दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी वक्तव्य की जात आहेत. कुणी काहीही बोलत आहे. मराठा समाज हा वंजारी समाज बांधवाविरुद्ध तर वंजारी समाज हा मराठा समाज बांधवांच्या विरुद्ध बोलत आहे. प्रत्येक गोष्ट जातीवरच आणून ठेवली जात आहे. एखाद्या अधिकाऱ्याचे नाव जरी विचारले तरी त्याचा संबंध थेट जातीशी जोडला जात आहे हे कितपत योग्य आहे ? बीड जिल्ह्या बाहेरचे लोक येऊन जिल्ह्यात दोन समाजामध्ये तेढ निर्माण कसे होईल हे पाहत आहेत. मराठा आणि वंजारा समाजाविषयी प्रक्षोभक बोलून दोन्ही समाजाला एकमेकाविरुद्ध भडकवण्याचे काम करत आहेत. अधिकाऱ्यांची गुणवत्ता, त्याची काबिलियत न पाहता थेट जातीवर बोलले जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेला हा प्रकार कुठेतरी थांबायला हवा. जातियवाद रोखण्यासाठी कोणीतरी पुढे येणे आवश्यक आहे. अन्यथा हे असेच होत राहिले तर ते मराठा आणि वंजारा समाजासाठीच नव्हे तर बीड जिल्ह्यातील अखंड मानव जातीसाठी घातक ठरू शकते. त्यासाठी बीड जिल्हा वासियांनी माणुसकीच्या नात्याने पुढाकार घेऊन हा जातीयवाद, बुद्धीभेद आणि स्वार्थी राजकारण थांबवणे आवश्यक असल्याचे मोईन मास्टर यांनी सांगितले आहे.

## करूणा मुंडेंच्या गाडीत

धस यांनी यांनी वाल्मिक कराड आणि त्याच्याशी संबंधित लोकांच्या मालमत्तेची यादीच वाचून दाखवली. पुण्यामध्ये असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता आणि त्यांच्या किंमती सुरेश धस यांनी पुराव्यानिशी दाखवून दिल्या.

परळीत इराणी समाजचे काही लोक आहेत. ते लोक गांजा, चरस आणि पिस्तुलाचा काळा बाजार करतात. थर्मलमध्ये रोज भंगार चोरीला जातं. त्यातही आकाचा वाटा असतो. करूणा मुंडे किंवा डॉक्टर देशमुख असोत. यांच्यावर खोट्या अट्रॉसिटी दाखल करण्यात आलेल्या आहेत. करुणा मुंडेंच्या गाडीमध्ये बंदूक ठेवलेल्या पोलिसाचं नाव संजय सानप असं आहे. त्याच्या जोडीला आणखी दोघे आहेत. यांनी बुरखा नेसून गाडीत बंदूक ठेवली. त्या धनंजय मुंडेंच्या पहिल्या पत्नी आहेत, तरीही त्यांनी असं केलं आणि त्यांना जेलमध्ये टाकलं.

## परळी म्हणजे बिहारचा

पसरलेली आहे. जर एकट्या परळीत १०९ मृतदेह सापडत असतील, तर त्या जिल्ह्याची स्थिती काय असेल? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

त्या म्हणाल्या की, फक्त तीन प्रकरणांची चौकशी व्यवस्थित सुरु आहे, बाकीच्या १०६ प्रकरणांमध्ये चौकशीचे काम योग्य रीतीने होत नाहीय. या संदर्भात त्यांनी आरोप केला की, या क्षेत्रातील पोलीस यंत्रणेवर स्थानिक आमदार आणि वाल्मीक कराड यांचा कंट्रोल आहे. हा कंट्रोल यंत्रणेवरचा निघाला पाहिजे, यासाठी धनंजय मुंडे यांचा राजीनामा होणं महत्वाचं आहे, असं त्या म्हणाल्या.

## शरद पवारांचा पक्ष

जाण्याच्या मानसिकतेत असल्याची चर्चा गेले काही दिवस सुरू आहे.अजित पवार यांच्या पक्षातील ज्येष्ठ नेत्याच्या म्हणण्यानुसार सगळेच आमदार आमच्या पक्षात येण्यासाठी उत्सुक असले, तरी तीन आमदारांना पक्षात घेण्याबाबत आमचे वरिष्ठ नेते तयार नाहीत. तसेच खासदारांपैकीही तीन खासदार सोडून बाकी सगळे येण्यासाठी तयार असून निर्णय पक्षश्रेष्ठींनी घ्यायचा असल्याचे या नेत्याने 'मटा'ला सांगितले.

दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान संपर्क साधून, पक्षप्रवेश करण्याची ऑफर दिल्याचा खळबळजनक दावा, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदारांनी बुधवारी केला. शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे 'बाप-लेक' सोडून सर्वांनी राष्ट्रवादीत या अशाप्रकारचे

आवाहनही करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला. तटकरे यांच्यासह सोनिया दुहानही खासदारांशी संपर्क साधत असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून करण्यात येत असून तटकरे यांनी मात्र बाप लेकीला सोडून अशी भाषा वापरल्याचे जोरदार खंडन केले आहे. तसेच, दहा जानेवारीला पत्रकार परिषद घेऊन कोणत्या नेत्याशी काय चर्चा झाली हे उघड करू, असेही तटकरे यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जून २०२४ मध्ये फूट पडल्यापासून सातत्याने दोन्ही गटांकडून आमदार-खासदार पळविण्याचा दावा करण्यात येत होता. लोकसभा निवडणुकीत जबरदस्त यश मिळाल्यापासून अजित पवार यांचे नेते आमच्यासोबत येण्यास उत्सुक असल्याचा दावा राष्ट्रवादी-शप पक्षाकडून करण्यात येत होता, परंतु, विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या पक्षाने चांगले यश मिळवले. त्या दिवसापासून अजित पवार यांच्या नेत्यांकडून शरद पवार यांच्या पक्षातील अनेक जण सोबत येणार असल्याचा दावा केला जात होता.

अजित पवार दिल्लीत

उपमुख्यमंत्री अजित पवार बुधवारी सायंकाळी दिल्लीला रवाना झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेटण्यासाठी ते गेले आहे असल्याचे समजते. ही भेट राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातील संभाव्य फूट या विषयी आहे किंवा इतर कोणत्या प्रश्नावर पवार यांना शहा यांच्याशी सल्लामसलत करायची आहे यावर खुलासा होऊ शकलेला नाही.